ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. PNC-116, Licence No. 34

वर्ष ४० पुणे, बुधवार १६ जानेवारी, १९७४ अंक २

## आम्ही आता आपल्या ठेवींवर दरमहा व्याज देतो.

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार ल्हावा या हेतूने आम्ही ही नवी ठेवयोजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेवयोजनेखाली किमान २४ महिने पर्यंत ठेवा.

आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल, अशापैकी कोणतेही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

**दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित राहते हे ह्या योजनेचे वैशिष्ट्य आहे.**

अधिक तपशिलाकरता नजीकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस – ११७७, बुधवार पेठ, पुणे – २

# व्यवस्थापकीय समस्या

( सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. )

तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची मार्गदर्शक नेतृत्वासंबंधी चाचणी घ्या!

येथे १० प्रश्न दिलेले आहेत. त्या प्रश्नांच्या आधारे आपल्या वरिष्ठांची चाचणी घेऊन त्यांना प्रत्येक प्रश्नाला ० ते १० पर्यंत गुण द्या —

प्र. १. तुम्हाला काही अडचण आल्यास किंवा एखादी समस्या तुम्ही सोडवू शकत नसाल तर वरिष्ठांची तुम्हाला मदत असते का? तुमचे प्रश्न स्वतः सोडवून न देता तुमच्याकडूनच ते सोडवले जातील या दृष्टीने तुमचे वरिष्ठ प्रयत्नशील असतात का? त्यांच्या प्रोत्साहनानेच तुम्ही कठीण प्रश्न सोडवता ना? गुण...

प्र. २. तुमच्या कामाचे संबंधित माहिती व माणसे तुम्हाला चटकन उपलब्ध होतील या दृष्टीने ते कष्ट घेतात का? तुमच्या व्यवसायात तुमची लवकर उन्नती व्हावी याची ते काळजी घेतात का? गुण ......

प्र. ३. तुमचे वरिष्ठ सदा हसतमुख असतात का? त्यांचे वागणे खेळीमेळीचे असते का? प्रसंगी त्यांच्यावरच विनोद झाला तर ते स्वतः दिलखुलासपणे हसतात का? गुण ......

प्र. ४. तुमच्याविषयी त्यांची वागणूक न्याय्य आहे का? तुमच्या कामात व प्रगतीत ते रस घेतात का? तुम्ही चांगले काम केले तर शाबासकी देतात का? पण त्याचवेळी तुम्ही कबूल केलेले कामही योग्य वेळी करवून घेतात का? गुण......

प्र. ५. तुमच्या कामकाजात लहानसहान बाबीतही लक्ष घालून ते निर्णय देतात का? की असल्या गोष्टीत निर्णय देण्याची टाळाटाळ करून वेळ घालवतात? गुण......

प्र. ६. त्यांच्या हातून एखादी चूक घडली तर उघडपणे ते कबूल करतात का? पुन्हा एवढी ही चूक होणार नाही ह्याची ते दक्षता घेतात का? इतरांनीही याप्रमाणेच वागावे अशी ते अपेक्षा धरतात का? गुण......

प्र. ७. तुमचे वरिष्ठ, प्रसंगी, स्वतःच्या व्यक्तिगत हिताची गोष्ट बाजूला ठेवून संस्थेच्या किंवा त्यांच्या हाताखालच्या माणसांच्या हिताची गोष्ट करतात का? उदा. स्वतःच्या मेव्हण्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या त्याहून लायक माणसाची नेमणूक करतात का? गुण......

प्र. ८. ते खंबीरपणे धोरण ठेवून वागतात का? त्यांचा वेळ फुकट घालवणाऱ्या प्रतिष्ठित पाहुण्यांना किंवा त्यांच्या वरिष्ठांना टाळू शकतात का? गुण......

प्र. ९. तुम्ही कामात केलेल्या चुकांबद्दल चर्चा करण्यास मुद्दाम तुम्हाला बोलावतात का? या चुकांपासून तुम्ही काय शिकला आणि त्या तुम्ही कशा सुधारल्या यांची ते चौकशी करतात का? कामाचा योग्य वेळात उरक पाडण्याच्या हतूने ते प्रयत्नशील आहेत का? एखादी आनंदाची बातमी, जर त्यांच्यावर काही काम अडले नसेल तर, त्यांच्या कामात व्यत्यय आणून सांगितलेली त्यांना आवडत नाही ना? गुण......

प्र. १०. तुमचे वरिष्ठ कामाच्या निकालाबाबत संयम दाखवतात का? तुम्ही तुमच्या मेहनतीने काम उरकत असताना ते तुम्हाला योग्य वेळ देतात का? तुमचे काम उरकेपर्यंत ते उगीचच उतावीळपणा करतात का? गुण......

एकूण गुण ( १०० )

वरील चाचणीत तुम्ही तुमच्या वरिष्ठांना गुण देऊन त्यांची मार्गदर्शक म्हणून लायकी तपासू शकता. त्यांना जर ६५ च्या वर गुण मिळाले तर ते वरिष्ठ होण्यास लायक असू शकतील. पण जर ५० चे खाली गुण पडले तर मात्र तुम्ही नोकरी बदलण्याचा निर्णय घ्यावा. अशा वरिष्ठांचे हाताखाली काम करून तुमची प्रगती होणार नाही. अर्थात, तुम्ही लायक आहात, हे येथे गृहीत धरले आहे. ( आधारित )

## साखरकामगारांची जादा वेतनाची मागणी

महाराष्ट्रातील साखरकारखान्यांत उसाच्या तोडणीचे व कारखान्यापर्यंत त्याची वाहतूक करण्याचे काम करणारे सुमारे २ लाख कामगार आहेत. त्यांनी वाढत्या वेतनाची मागणी केली असून २९ जानेवारीला मागणीदिन पाळण्याचे ठरविले आहे. त्या दिवशी सर्व कामगार संपावर जाणार आहेत. सर्वपक्षीय कामगार संघटनेने ही संपाची हाक दिलेली आहे. तोडणीचे काम करणाऱ्या कामगारांना दर टन वजनाच्या तोडणीसाठी किमान १० रुपये देण्यात यावेत, आणि बैलगाड्यांनी उसाची वाहतूक करणाऱ्या कामगारांना पहिल्या मैलासाठी किमान ५ रुपये आणि त्यानंतरच्या मैलासाठी २ रुपये देण्यात यावेत अशी मागणी कामगार संघटनेने केली आहे. त्याचप्रमाणे साखरकारखान्यांतील प्रत्येक कामगाराला दरमहा ७५ रुपये हंगामी मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## चीनमध्ये महागाई–चलनवाढ नाही

चीनमधील अन्नधान्याचे उत्पादन कमालीचे वाढले आहे त्यामुळे चीन अन्नधान्याच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी आहे. चीनचा तेलाचा पुरवठा स्वतःच्या गरजा भागवून निर्गत करण्याइतका मोठा आहे. चीनचे चलन ८० देश सुखीने स्वीकारतात. गेल्या २४ वर्षांत गरजेच्या जिनसांच्या किंमती स्थिर राहिल्या आहेत; औषधांच्या किंमती ८०% ने कमी झाल्या आहेत आणि गरजेच्या काही जिनसांच्या किंमती २०% ने उतरल्या आहेत.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १६ जानेवारी, १९७४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

---

### भारत-अमेरिका संबंध सुधारण्याची शक्यता

पाकिस्तानशी १९७१ अखेर झालेल्या युद्धात अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घेतल्याने भारत व अमेरिका ह्यांचे संबंध खूपच बिघडले होते. आता हे संबंध पुन्हा निकटचे होऊ लागण्याची शक्यता दिसत आहे. पी. एल. ४८० कायद्याप्रमाणे अमेरिकेने दिलेल्या धान्याचा पैसा भारताकडे पडून होता. त्याची व्यवस्था आता लावण्यात आली आहे. अमेरिका-भारत संबंध सुधारण्याच्या मार्गावरील ते एक महत्त्वाचे पाऊल होते. उभयता देशांच्या संबंधांना नवी दिशा लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. संबंध सुधारल्यास दोन्ही देशांतील आर्थिक देवाणघेवाण वाढण्यास मदत होणार आहे. अमेरिका आणि रशिआ ह्यांचे संबंध मैत्रीचे नसले तरी आता पहिल्याइतके तेढीचे राहिले नाहीत. त्यामुळे रशिआशी भारताने केलेल्या दोस्तीच्या कराराची अमेरिकेला वाटणारी बोच कमी तीव्र झाली असल्याची शक्यता आहे. त्यातच अरब देशांनी तेलाच्या पुरवठ्याबाबत जगभर पेच निर्माण केल्याने अमेरिका आणि भारत अधिक निकट येण्याची शक्यता वाढली आहे. भारतामधील सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संघटनांना मदत देण्यास अमेरिका आजवर फारशी उत्सुक नव्हती. पण आता ही विरोधी भावना कमी झाली आहे अगर होत आहे. बऱ्याच अमेरिकन कंपन्यांनी भारतात भांडवल गुंतविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. विशेषत: तेलसंशोधन, रासायनिक खतांचे उत्पादन आणि कोळशाचे उत्पादन ह्या बाबतीत उत्सुकता दाखविण्यात येत आहे.

---

### पाचव्या कार्यक्रमात बेकारीची दखल पुरेशी नाही

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे डॉ. सेन कलकत्ता येथे बोलताना म्हणाले की पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात पूर्वीच्या कार्यक्रमापेक्षा बेकारीच्या प्रश्नाकडे कमी लक्ष देण्यात आले आहे. इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट ह्या संघटनेच्या पदवीदान प्रसंगी ते भाषण करीत होते. ते म्हणाले की ह्या कार्यक्रमात बेकारीच्या प्रश्नाचे गांभीर्य पद्धतशीरपणे व्यक्त करण्यात आले आह. परंतु त्याच्या सोडवणुकीकडे मात्र त्याच पद्धतीने दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. त्यामुळे बेकारीवरील विभाग थट्टेचा विषय झालेला आहे. ह्या कार्यक्रमात बेकारीच्या संख्येविषयी नीटसा अंदाज व्यक्त करण्यात आलेला नाही किंवा पाचव्या कार्यक्रमात रोजगारीच्या किती संधी नव्याने निर्माण करण्यात येतील ह्याबद्दलही कल्पना देण्यात आलेली नाही. अर्थातच कार्यक्रमाची विश्वासपात्रता अगदी खालच्या पातळीवर गेलेली आहे. कारण, राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीचे एक प्रमुख साधन म्हणून रोजगाराच्या संधींना महत्त्व प्राप्त झालेले आहे. पाचव्या कार्यक्रमाच्या मूलभूत उद्दिष्टात बेकारीच्या उच्चाटनाला मात्र प्राधान्य देण्यात आलेले आहे. असा अंदाज करता येतो की १९७१ साली ग्रामीण भागातील रोजगार हव्या असणाऱ्या लोकांपैकी एक तृतीयांश लोक बेकार होते. एकूण संख्येचा अंदाज करावयाचा झाल्यास हा आकडा ४·२४ कोटी असा सांगता येईल. ज्या रोजगारीमुळे उत्पादक साधने निर्माण होतील त्या रोजगारीची निर्मिती करण्याच्या दृष्टिकोनाने हा अंदाज करण्यात आला आहे.

---

### फ्रान्सचा शस्त्रास्त्रांचा व्यापार

शस्त्रास्त्रांचा व्यापार म्हटले की अमेरिका आणि रशिआ ह्या दोन बड्या देशांची नावेच एकदम लक्षात येतात. वास्तविक औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेले सर्वच देश ह्या व्यापारात गुंतलेले आहेत. फ्रान्स हा असाच देश असून अलीकडे त्याने पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरविण्याची तयारी दाखविलेली आहे. ह्या धोरणात तसे नवीन काही नाही. कारण कोणत्याही खरेदीदाराला शस्त्रे पुरविण्याचे फ्रान्सचे धोरण त्याच्या नेहमीच्या व्यापारी वृत्तीला धरूनच आहे. मद्याच्या निर्यातीच्या खालोखाल फ्रान्स शस्त्रास्त्रे निर्यात करून परदेशीय चलन मिळवीत असतो. परंतु अलीकडे त्याच्या शस्त्रास्त्रांच्या निर्यातीला मंदी आलेली होती. व्हिएटनाममधील युद्ध थांबल्यापासून अमेरिकेजवळ विकण्यासाठी अधिक शस्त्रास्त्रे उपलब्ध झाली आहेत. शिवाय त्यांचा दर्जा चांगला असून किंमतही माफक आहे, ह्या परिस्थितीचा परिणाम फ्रान्सच्या शस्त्रास्त्रांच्या व्यापारावर झाला आहे. फ्रान्सचे शस्त्रास्त्रांचे कारखाने मागणी अभावी बंद पडण्याची पाळी आली आहे. फ्रान्सची शस्त्रास्त्रांची निर्यात ५० टक्क्यांनी घटली आहे. तेव्हा पाकिस्तानसारख्या देशाकडे निर्यात वाढविता आली तर फ्रान्सला ती पाहिजे आहे. पाकिस्तानप्रमाणेच पश्चिम आशिआतील तेलाने समृद्ध असणाऱ्या देशांनाही फ्रान्स शस्त्रास्त्रे विकतो. पण, ह्या व्यापारात एक अडचण आहे. पश्चिम आशिआतील अरब देश तांत्रिक दृष्ट्या मागासलेले आहेत. त्यामुळे दिलेल्या शस्त्रास्त्रांची दुरुस्ती अगर देखभाल त्यांना जमत नाही. ह्या बाबतीत पाकिस्तान जरासा पुढारलेला आहे. तेव्हा पाकिस्तानात शस्त्रास्त्रांचा कारखाना उघडून अरब देशांची सोय करण्याचाही विचार फ्रान्स करीत आहे.

## भारताला रशिआकडून आधुनिक शस्त्रास्त्रांची मदत

रशिआने भारताला आधुनिक शस्त्रास्त्रे पुरविण्याचे मान्य केले आहे. त्यात 'सॅम ६' ह्या क्षेपणास्त्रांचा आणि 'याकोव्होलेव्ह' जातीच्या विमानांचा समावेश आहे. भारताजवळील 'विक्रांत' ह्या विमानवाहू बोटीवर सध्या 'सीहॉक' जातीची ब्रिटिश बनावटीची विमाने आहेत. परंतु ती आता जुनी झाली असून त्यांच्या जागी ब्रिटिश बनावटीची 'हॅरिअर' जातीची विमाने घेण्याची खटपट चालू होती. काही अडचणीमुळे ही विमाने भारताला मिळू शकतील की नाही ह्याविषयी शंका उत्पन्न झाली होती. 'हॅरिअर' जातीच्या विमानांना उड्डाणासाठी थोडी धावपट्टी पुरते. रशिआकडून मिळणारी विमाने ह्याच प्रकारची आहेत. भारताने आपली शस्त्रसज्ज दले अद्ययावत राखण्याची खटपट सतत चालू ठेवलेली आहे. ह्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून विमानदल आणि नौदल ह्यांची युद्धक्षमता वाढविण्यात येत आहे. 'सॅम ६' ह्या क्षेपणास्त्रांचा पुरवठा भारताला लवकरच होऊ लागेल. गेल्या अरब-इस्राएल युद्धात ह्या अस्त्रांनी चांगली कामगिरी बजावलेली आहे. ह्या क्षेपणास्त्राशिवाय इतर कमी गुंतागुंतीच्या क्षेपणास्त्रांचे उत्पादन करण्याचे तांत्रिक ज्ञानही रशिआ भारताला देणार आहे. अशी काही क्षेपणास्त्रे भारताचे विमानदल आजही वापरीत आहेच. रशिआखेरीज पूर्व युरोपातील देशांकडून आणि ब्रिटन-फ्रान्सकडून युद्ध साहित्य मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. विमानदलाला रशिआकडून जी सामग्री मिळत आहे त्यामुळे संरक्षण व्यवस्थेबाबत भारत आशिआतील इतर कोणत्याही देशाइतका स्वसंरक्षणक्षम बनेल. वायुदलाचे सामर्थ्य नव्या अद्ययावत विमानांनी वाढविण्याचे प्रयत्नही होत आहेत.

---

## निर्यातीवर परिणाम होण्याचा संभव

मध्यवर्ती सरकारच्या व्यापारखात्याला ह्या वर्षी २,००० कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात होऊ शकेल अशी उमेद वाटत आहे. परंतु तेलाबाबत निर्माण झालेल्या पेचप्रसंगामुळे भारताची निर्यात ह्यापेक्षा कमी होण्याची शक्यता दिसत आहे. ब्रिटन भारताकडून अजूनही कापड, ताग आणि चहा आयात करते. भविष्यात मात्र ब्रिटनची बाजारपेठ कितपत टिकेल ते सांगता येत नाही. अरब देशांनी तेलाच्या किंमती वाढविल्यामुळे पश्चिम युरोपातील देशांच्या अर्थव्यवस्थेवरही वाईट परिणाम दिसू लागले आहेत. ब्रिटनमधील बहुतेक मोठ्या कारखान्यांनी ३ दिवसांचा कामाचा आठवडा चालू केला आहे. त्यामुळे जवळजवळ १० लाख कामगारांना तात्पुरती बेकारी सहन करावी लागत आहे. युरोपमधील इतर प्रगत देशांतही अशीच परिस्थिती उद्भवत आहे. अर्थातच उत्पादनात खंड पडल्यामुळे तेथे आर्थिक व्यवहार मंदगतीने चालू लागतील आणि त्याचा परिणाम भारताकडून आयात करण्यात येणाऱ्या मालात घट होण्यात होईल असे दिसते. युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी ह्या संघटनेतील देश भारताकडून आयात होणाऱ्या मालावर कमी जकात घेण्यास तयार झाले अगर त्यांनी जकात घेतली नाही तर भारताला त्याचा फायदा मिळेल हे खरे. पण, ह्या फायद्याला भारताची निर्यात कमी झाल्यास मोठाच शह बसणार आहे. भारताकडून आयात करण्यात येणाऱ्या मालावर काही तरी निर्बंध तरी बसणारच. त्यामुळे भारत निर्यात करीत असलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या व अर्धसंस्कारित मालाचा परदेशीय उठाव घटण्याचा बराच संभव आहे.

---

## विमानांच्या कारखान्यांना तेलटंचाईचा फटका

एअर इंडिआचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. के. के. उनी ह्यांनी मुंबईतील रोटरी क्लबपुढे बोलताना चालू तेलटंचाईचा विमानांच्या कारखान्यांवर व वाहतुकीवर कसा परिणाम झाला आहे ते विशद केले आहे ते म्हणतात की, तेलटंचाईचा जबर फटका विमाने तयार करणाऱ्या कारखान्यांना जगभर बसला आहे. कारण, विमान-वाहतूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना नव्या विमानांसाठी नोंदलेल्या मागण्या रद्द कराव्या लागल्या आहेत. सध्या जाणवत असलेली तेलटंचाई अशीच चालू राहिल्यास 'कन्कॉर्ड' सारखी ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणारी विमाने वापरात आणणे भविष्य-काळी विमान कंपन्यांना शक्य होईल असे वाटत नाही. तेल-टंचाईमुळे मोठमोठ्या विमानकंपन्यांना आपल्या उड्डाणांची संख्या कायम कशी राखावी ह्याबद्दल चिंता वाटू लागली आहे. अर्थातच अनेक कंपन्यांना आपल्या विमानांच्या खेपा कमी कराव्या लागल्या आहेत अगर लागत आहेत. विमान वाहतुकीच्या अर्थशास्त्रात इंधनाच्या खर्चाला दुसऱ्या क्रमांकाचे स्थान आहे. विमानांच्या इंधनाची किंमत जवळजवळ सर्वच देशांत वाढलेली आहे. इराणच्या आखाताजवळील तेल उत्पादन करणारे देश आणि अरब देश हेही वाढत्या किंमतीतून सुटलेले नाहीत. परिणामी विमानवाहतुकीच्या खर्चात सर्वत्र २० टक्के वाढ झालेली आहे. विमानवाहतुकीच्या अर्थशास्त्राचा विचार करताना सर्वात अधिक महत्त्व ह्या किंमतवाढीला आहे. भारताची गोष्ट तर अधिकच वेगळी आहे. कारण, भारतामधील विमानांच्या इंधनात झालेली वाढ इतर कोठल्याही देशांच्या मानाने अधिक आहे.

---

### वाचकांना नम्र सूचना

कागदाची दुर्मिळता आणि महर्गता, त्याचप्रमाणे छपाईच्या खर्चात असह्य वाढ, त्याच्या जोडीला काही जाहिरातदारांनी नाइलाजाने केलेली जाहिरातीमधील कपात, ह्याचा अर्थावर कमालीचा ताण पडला आहे त्यामुळे, ६ फेब्रुवारीचा आणि २० फेब्रुवारीचा अंक जोड-अंक म्हणून प्रसिद्ध करणे आम्हांस भाग पडत आहे. वाचक ह्या त्रुटीकडे सहृदयतेने पाहातील, असा विश्वास आहे.

— संपादक

# शब्द असे जन्मतात आणि मरतात

(लेखक : डॉ. अ. वा. वर्टी)

[ "आपण" ह्या साप्ताहिकात डॉ. अ. वा. वर्टी ह्यांचे "तिरके बाण" दर अंकात प्रसिद्ध होत असतात, ते अत्यंत मार्मिक असतात. दि. १२ जानेवारी, १९७४ च्या अंकात वरील विषयावर त्यांचा एक उद्बोधक लेख प्रसिद्ध झाला आहे. बदललेल्या परिस्थितीत तीच गोष्ट व्यक्त करण्यासाठी नवे शब्द कसे वापरले जातात, हे त्यावरून दिसून येते. आपल्या सबंध जीवनावर राजकारणाची आणि अर्थकारणाची छाया पडलेली आहे. तोच अनुभव नव्या शब्दांच्या वापराचे संबधात येतो, असे प्रस्तुत लेखावरून दिसून येते. हा लेख आमच्या वाचकांनाही उद्बोधक वाटेल, म्हणून आम्ही तो आभारपूर्वक उद्धृत करीत आहो. ]

आजकाल एखादी घटना किंवा कल्पना व्यक्त करण्याकरिता पूर्वीचे शब्द बाजूला सारून नवे शब्द कसे वापरण्यात येतात, ते पाहण्यासारखे आहे.

पूर्वी लढाईत एखाद्या सैन्याचा पराभव झाला की मार खाऊन रणांगण सोडून त्याने पळ काढला असे म्हणण्यात येई. आज हीच गोष्ट 'आमच्या सैन्याने यशस्वी माघार घेतली,' ह्या शब्दांनी जाहीर करण्यात येते.

पूर्वी काही लोकांचा निर्देश अस्पृश्य किंवा महार, मांग, चांभार अशा जातिवाचक शब्दांनी करण्यात येई. परंतु ह्या जातिवाचक नावामध्ये एक प्रकारचा अपमान अन् तुच्छता सूचित होते म्हणून महात्मा गांधींनी ह्या लोकांना 'हरिजन' हे सोज्वळ नाव दिले. परंतु खुद्द हरिजनांना आज हा शब्द आवडेनासा झाला आहे. त्याऐवजी ते 'दलित' हा शब्द पसंत करू लागले आहेत. 'हरिजन'पेक्षा 'दलित' हा शब्द सवर्णाविषयी अधिक चीड निर्माण करू शकतो व राजकीय दृष्ट्या अधिक उपयोगी पडू शकतो, हे त्याचे मोठे फायदे आहेत. म्हणून अलीकडे हरिजनाला मागे सारून दलित पुढे आला आहे.

पूर्वी एखाद्या पुढाऱ्याच्या भानगडी वगैरे वृत्तपत्रांतून छापून आल्या की त्याची निंदानालस्ती केली किंवा बदनामी केली असे म्हणत. आज ह्याच गोष्टीला 'चारित्र्यहनन' हा भारदस्त शब्द वापरण्यात येतो. ह्या शब्दांतून त्या पुढाऱ्याचे चारित्र्य निष्कलंक आहे पण उगाच त्यावर शिंतोडे उडविण्यात येत आहेत असेही सुचविले जाते. त्यामुळे चारित्र्यहनन हा शब्द अधिकाधिक लोकप्रिय होत चालला आहे.

पूर्वी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात एखादी व्यक्ती गेली की तिने पक्षाचा विश्वासघात केला, किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी तिने पक्षांतर केले, असे म्हणून तिला ठपका देण्यात येई. आज ह्याच गोष्टीचे वर्णन 'सदसद्विवेकबुद्धीला जागून केलेली वागणूक' ह्या शब्दांनी करण्यात येते. अर्थात मग ह्या पक्षांतरात वैयक्तिक स्वार्थ, लबाडी, विश्वासघात वगैरे गोष्टींचा वास येत नाही. ही सदसद्विवेकबुद्धीला धरून झालेली पक्षांतरे बहुतेक विरोधी पक्षांतून सत्ताधारी पक्षात झालेली असतात, हा केवळ योगायोग समजायचा.

सत्ताधारी पक्षातील सर्वांनाच मंत्रिपदे किंवा अधिकाराच्या जागा किंवा इतर स्वरूपातला मलिदा मिळणे शक्य नसते. असे सदस्य कुरबूर करू लागतात. मग ते पुढाऱ्यांविरुद्ध चळवळ करू लागतात. आम्हांला काही तरी द्या, नाहीतर आम्ही तुमचे मंत्रिमंडळ उलथून पाडू, अशी जरी ते स्पष्ट धमकी देत नसले तरी त्यांच्या साऱ्या कारवाया ह्याच दृष्टीने चाललेल्या असतात. पूर्वी अशा सदस्यांना बंडखोर म्हणत. परंतु ह्या कडक शब्दांची जागा आता 'असंतुष्ट' ह्या सौम्य शब्दाने घेतली. बंडखोर म्हटला की त्याला शिक्षा केली पाहिजे. शिक्षा न केल्यास त्याच्यासमोर नमल्यासारखे होते. ह्याउलट असंतुष्टाला फक्त 'संतुष्ट' करावयाचे असते. ह्यात पुढारी मंडळींचाही आब कायम राहतो. म्हणून 'असंतुष्ट' हा शब्द 'बंडखोर'ला मागे सारून पुढे येत आहे.

पूर्वी एखादी गोष्ट करावी म्हणून सरकारात अर्ज केला तर एक तर ती गोष्ट केली जाई किंवा ती करणे शक्य नाही म्हणून कळविले जाई. परंतु आज लोकशाही असल्यामुळे इतके कठोर उत्तर देता येत नाही. तेव्हा एखादी गोष्ट करवयाची नसल्यास तुमचा अर्ज 'विचाराधीन' आहे, असे उत्तर देण्यात येते. सध्या सरकारी कामकाजात 'विचाराधीन' हा शब्द मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येतो. कारण बहुतेक प्रकरणे अनंतकाळपर्यंत 'विचाराधीन' अवस्थेतच राहतात.

पूर्वी पाऊस झाला नाही की दुष्काळ पडे. आता दुष्काळ पडत नाही. फक्त 'टंचाई' निर्माण होते. पूर्वी दुष्काळात लोक भुकेने मरत. म्हणजे 'भूकबळी' होत. आज भूकबळी कोणी होतच नाही. दुष्काळातले सगळे मरतात ते 'योग्य पोषणाच्या अभावी' किंवा 'गॅस्ट्रोने' किंवा 'हृदयक्रिया बंद पडून'. सध्या भुकेने तडफडून कोणीच मरत नाही. कसे मरणार आजच्याइतके लोकहितदक्ष सरकार राज्य करीत असताना?

पूर्वी हिंदु-मुसलमानांचे दंगे होत. आजची वृत्तपत्रे पाहिली तर हिंदु-मुसलमानांचे दंगे बंद झालेले दिसून येतील. आता फक्त झालेच तर दोन जातीत दंगे होतात. ह्यात मुसलमान कधीच नसतात. असते ती 'अल्पसंख्य जमात'. देवळे, मशिदी ही आता दंग्यात जाळली, फोडली जात नाहीत. त्याऐवजी 'प्रार्थनामंदिरे' फोडली किंवा जाळली जातात.

आज मराठी ही जात राज्यकर्ती जात आहे. परंतु मराठा जमातीला मराठा जात म्हणणे अयोग्य आहे. तिला मिळणारे सर्व फायदे 'बहुजनसमाज' (किंवा 'माऊजनसमाज') ह्या नावाखाली मिळविणे लोकशाहीला आणि समाजवादाच्या कल्पनेला अधिक धरून आहे. म्हणून आता हा शब्द सर्वत्र

प्रचारात आहे. शिवाय जातिवाचक शब्द वापरणे हे राष्ट्रीय एकात्मतेला विघातक आहे.

पूर्वी राजेलोक किंवा श्रीमंत लोक परदेशच्या दौऱ्यावर जात आणि तेथे मौजमजा करून येत. आजच्या मंत्र्यांना आणि लोकप्रतिनिधींना अशी मौजमजा करण्याकरिता परदेश दौरे करणे शोभण्यासारखे नाही. म्हणून आजचे मंत्री, अधिकारी परदेशात जातात ते 'प्रतिनिधी मंडळा'तून एखाद्या 'अधिवेशना'-करता. परदेशात जाणे जमण्यासारखे नसल्यास ही 'अधिवेशने', 'परिषदा' किंवा 'सेमीनार' सिमला, नैनितालसारख्या भारतातील थंड हवेच्या ठिकाणी भरविण्यात येतात. ह्या शब्दप्रयोगाने अधिवेशनांना किंवा सेमीनारांना गेलेली प्रतिनिधी मंडळी दिवसाचे चोवीस तास चर्चा, विचारविनिमय करण्यात गर्क होऊन राहिली असतील, असा साहजिकच समज होतो.

असे हे शब्द जन्मतात, नि मरतात किंवा त्यांचे अर्थरूप बदलते. हा सारा प्रकार मोठा मनोरंजक आहे. पण काही काही शब्द मात्र क्रूर विनोद करतात. एखाद्या वस्तूची किंवा धान्याची 'किंमत उतरली' असे आपण वृत्तपत्रात वाचतो आणि मोठ्या आशेने बाजारात जातो. तेथे गेल्यावर आपल्याला तो माल बाजारातून अदृश्य झालेला दिसतो किंवा मिळालाच तर त्याचे भाव वाढलेले आढळून येतात. 'किंमत उतरली' हे दोन शब्द आपले अर्थ बदलून आपल्याशी इतका क्रूर विनोद करतील, अशी आपणाला कल्पना नसते!

## चित्रपटनिर्मितीचा उच्चांक

### १९७३ साली ४४८ चित्रपट; त्यांपैकी फक्त १४ मराठी

भारताच्या चित्रपटधंद्याने १९७३ मध्ये उच्चांक गाठला; त्या १२ महिन्यात ४४८ भारतीय चित्रपट सेन्सॉर झाले. १९७२ च्या मानाने हा आकडा ९.५४% ने आणि १९७१ च्या मानाने ३.४६% ने मोठा आहे. चित्रपटनिर्मितीचा हा उच्चांक आहे.

उत्पादनखर्चातील वाढीमुळे रंगीत चित्रपटांची निर्मिती १९७२ च्या मानाने ३.८३% ने कमी झाली; एकूण १७१ रंगीत चित्रपट निर्माण करण्यात आले.

मुंबईत निर्माण झालेल्या १४५ चित्रपटांत ११७ हिंदी, १४ मराठी, ५ गुजराती, ५ पंजाबी, १ इंग्रजी, १ राजस्थानी, १ हरियाणावी आणि १ सिंधी होता. मद्रासमधील २५७ चित्रपटांत २१ हिंदी आणि कलकत्त्यातील ४६ चित्रपटांत १ हिंदी होता. रंगीत चित्रपटांच्या निर्मितीत मुंबई (११४) अग्रेसर. त्या खालोखाल मद्रास (५६) आणि कलकत्ता (१) असा अनुक्रम आहे.

---

एनसॅयक्लोपेडिया ब्रिटॅनिका—जगप्रसिद्ध, २४ खंडांच्या एनसॅयक्लोपेडिया ब्रिटॅनिकाची लांबी-रुंदी आता बदलण्यात येणार आहे. त्यासाठी २६ कोटी रु. खर्च येईल. १९२९ नंतर लांबी-रुंदी ह्या आधी बदललेली नव्हती.

## रासायनिक खताची तूट भरून काढण्याचे प्रयत्न

सैन्य पोटावर चालते अशा अर्थाचे एक वचन आहे. तसे म्हटले तर सर्व मानवी जीवनच पोटार्थी व म्हणून पोटावर चालणारे आहे. पोटाला चिमटा बसण्याच्या कल्पनेनेसुद्धा माणूस चिंतामग्न होतो. म्हणूनच की काय अरब देशांनी युरोपीय देशांना व अमेरिकेला तेलपुरवठा बंद केल्यावर अमेरिकेच्या उपाध्यक्षांनी पश्चिम आशियातील देशांना अमेरिकेकडून होणारा धान्याचा पुरवठा तोडण्याची धमकी दिली. तेलाचा पुरवठा कमी अगर बंद झाल्यावर ज्या अनेक आपत्ती संभवतात त्यात रासायनिक खताच्या अभावाने शेतीचे उत्पादन घटण्याची आपत्ती मोठी आहे. भारताला खतउत्पादनासाठी लागणारा नॅफ्ता कमी पडला तर अन्नधान्याचे उत्पादन खाली येण्याची भीती आहे. ही अडचण जाणून इराणने भारताला नॅफ्ता आणि रासायनिक खते पुरविण्याची तयारी दाखविली आहे. सध्या उभयता देशांत ह्यासंबंधी वाटाघाटी चालू आहेत. खुद्द भारतामधील रासायनिक खताचे उत्पादन गरजेपेक्षा बरेच कमी आहे. अर्थातच खताच्या आयातीशिवाय दुसरा मार्ग नाही. पुढील वर्षी सुमारे ३९ लाख टन रासायनिक खत उपलब्ध होऊ शकेल असा अंदाज करण्यात आला आहे. ह्या वर्षी देशातील उत्पादन सुमारे १०॥ लाख टन होईल अशी अपेक्षा आहे. पुढील वर्षी खताच्या उत्पादनात वाढ होण्याची शक्यता जमेस धरूनही २० लाख टन खताची आयात करावी लागणार आहे. खताच्या आयातीबाबत अमेरिकेकडून फारशी मदत होण्यासारखी नाही. अशा परिस्थितीत रशिआकडून काही खत मिळण्याची चाचपणी करण्यात येत आहे. सर्व नाही तरी गरजेपैकी ५ लाख टन अगर त्यापेक्षा थोडे अधिक खत रशिआकडून मिळण्याची शक्यता दिसत आहे.

## क्रेडिटच्या आखडत्या मर्यादा : कारखान्यांची कुचंबणा

बँकांच्या कर्ज देण्यावरील कडक नियंत्रणामुळे उद्योगधंद्यांची कुचंबणा झाली आहे. नियंत्रणाचे नवे धोरण जाहीर होण्यापूर्वी बँकांनी मंजूर केलेल्या क्रेडिटच्या मर्यादा आखडाव्या लागल्या आहेत. लघुउद्योगांना दैनंदिन गरजा भागविणेही कठीण झाले आहे, कारण त्यांची आर्थिक परिस्थिती अगोदरच बेतासबाताची होती. त्यांना बँकेकडून जादा कर्ज मिळणे आता अशक्य झाले आहे. त्यातील बहुतेक लघु उद्योग मोठ्या कारखान्यांना सुटे भाग तयार करून विकतात. मोठ्या कारखान्यांवरही क्रेडिट गोठण्याची आपत्ती आल्यामुळे त्यांनी ऑर्डरी कमी केल्या आहेत किंवा बिलांची रक्कम देण्याचे पुढे ढकलले आहे. काहींनी कर्जाचा विनियोग ॲडव्हान्स इन्कमटॅक्स भरण्याकडे केल्यामुळे कामगारांचे वेतन देण्यासही पैसा उपलब्ध नाही. बँकांकडील ठेवींच्या वाढीची गती कर्जाच्या वाढीच्या गतीच्या मानाने फारच कमी आहे.

---

३५१ बोगस उद्योगधंदे—गेल्या वर्षी महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनने ३५१ लबाड फर्म्सची नावे आपल्या पटावरून काढून टाकली. ह्या फर्म्स लोखंड आणि पोलाद मिळवून जादा भावाने विकून टाकीत असत.

## बहुपतित्वाच्या चालीने लडाखच्या लोकसंख्येला आळा

इंडियन हिस्ट्री कॉंग्रेसचे ३४ वे अधिवेशन चंदीगढ येथे भरविण्यात आले होते. ह्या अधिवेशनात चंद्रीगढ येथील प्रा. दत्ता ह्यांनी लडाखमधील बहुपतित्वाची चाल ह्या विषयावर एक निबंध सादर केला. त्यात ते म्हणतात की, लडाखमधील ह्या चालीमुळे सामाजिक व आर्थिक भरभराट घडवून आणण्यास तेथे मदत झालेली आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येच्या वाढीलाही आळा बसला आहे. ह्या चालीमुळे एका स्त्रीला एकापेक्षा अधिक पती करता येतात. काही वेळा हे पती एकमेकांचे भाऊही असतात. लडाखी लोकसमाजाच्या काही खास गरजा भागविण्याच्या हेतूने ह्या पद्धतीचा जन्म झालेला दिसतो. ह्या प्रदेशात पिकाऊ जमीन फारशी उपलब्ध नाही. तेथील खनिज संपत्तीही बेताचीच आहे. लोकांना स्थलांतर करण्यास वाव नाही. कारण तेथील हवापाणी स्थलांतराला अनुकूल नाही. शिवाय भाषा आणि धर्म ह्यांनीही लोकांत अनेक प्रकारचे भेद पसरलेले आहेत. अशा परिस्थितीत लोकसंख्येची वाढ काही मर्यादेपलीकडे जाऊ न देणे आवश्यक होते. एकेका कुटुंबांतील विवाहित स्त्रियांची संख्या कमी करून हा उद्देश साध्य करण्यात आलेला दिसतो. लडाखमध्ये कुटुंबांच्या मालकीची मोठी विस्तीर्ण शेतजमीन नाही. कोणत्याही कुटुंबाकडे दोन अगर तीन एकरापेक्षा अधिक जमीन असत नाही. ह्या जमिनीची मालकीहक्काने विभागणी करण्याने कुटुंबात तेढीचे वातावरण सतत कायम राहिले असते. बहुपतित्वाच्या पद्धतीने घरातले वातावरण बिघडल्याचे अगर भावाभावांत वितुष्ट निर्माण झाल्याचे आढळून येत नाही.

---

## इंधन वाचविण्यासाठी रशियात उपाययोजना

जगातील इंधनाची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन रशियाने देशातील ८०० मोठ्या शहरांतून उष्णता पुरविणारी मध्यवर्ती केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. हळूहळू अशा केंद्रांच्या उभारणीमुळे दरसाल ४ कोटी टन इंधनाची बचत करता येईल असा अंदाज करण्यात आला आहे. केंद्रातून उष्णतेप्रमाणे वीजही पुरविण्यात येत असते. मोठ्या प्रमाणावर चालू ठेवण्यात येणाऱ्या अशा केंद्रांची कार्यक्षमता लहान केंद्रांपेक्षा बरीच अधिक असते. शिवाय त्यामुळे उष्णता निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणारी इतर साधने बंद करता येतात. लहान साधनांतून अनेकदा कमी प्रतीचे उष्णता निर्माण करणारे जळण वापरण्यात येते. हवेच्या प्रदूषणाचा धोका त्यांच्यामुळे वाढत असतो.

---

**दुष्काळग्रस्तांसाठी उपास**— आफ्रिकेतील इथिओपिआ देशात अवर्षणामुळे मोठा दुष्काळ पडला आहे. तेथील दुष्काळग्रस्त लोकांच्या स्थितीकडे लक्ष वेधावे म्हणून इंग्लंडमधील एका शिखाने उपवास सुरू केला आहे. त्याचे वय ४५ वर्षांचे असून नाताळात खाण्यापिण्याची मजा करणाऱ्या लोकांत त्याने भाग घेतला नाही. फक्त ६ कप कॉफी घेऊन तो राहिला.

## द्विराष्ट्रवाद म्हणजे फसवणूक

'जिये सिंध' ह्या पाकिस्तानातील संघटनेने द्विराष्ट्रवाद लोकांची फसवणूक करणारी कल्पना आहे अशा आशयाची पत्रके प्रसृत करण्यास प्रारंभ केला आहे. पत्रकात असे म्हटले आहे की, पाकिस्तान हा देश ऐतिहासिक उत्क्रांतीने निर्माण झालेला नाही. इतिहासातील एक अजब घटना म्हणूनच त्याचा उल्लेख करावा लागेल. पाकिस्तानच्या इतिहासाकडे लक्ष देता हे उघड करून येते की अखंड भारतामध्ये ज्या प्रांतांतून मुसलमान लोक अल्पसंख्य होते त्यांनी द्विराष्ट्रवादाचा 'शोध' लावला आहे. जगात २२ देश मुस्लीम संस्कृतीचे आहेत. त्यांपैकी सर्वच्या सर्व देशांनी आधुनिक राष्ट्रवादाचा आधार घेतलेला आहे. धर्माधिष्ठित राज्याची कल्पना फक्त पाकिस्तानातच प्रचलित आहे. ही कल्पना किळसवाणी तर आहेच; पण लोकांना ती मान्यही नाही.

---

## हिप्पींच्या चळवळीवर बंधनाची सूचना

इंडियन कौन्सिल ऑफ सोशल वेल्फेअर ह्या संघटनेच्या कार्यकारी समितीची बैठक पणजी येथे भरविण्यात आली होती. भारतात प्रसार पावणाऱ्या हिप्पींच्या संप्रदायाबद्दल बैठकीत विचार करण्यात आला आणि ह्या संप्रदायाच्या प्रसारावर व हालचालींवर संपूर्णपणे निर्बंध घालण्यात यावे अशी सूचना करण्यात आली. हिंदूंच्या सामाजिक जीवनात हिप्पींच्या संप्रदायामुळे भ्रष्टाचारी प्रवृत्तींचा शिरकाव होत आहे; शिवाय, हिप्पी तरुण त्यांच्या देशांच्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व तर करीत नाहीतच, उलट समाजात अमली पदार्थांचे सेवन आणि इतर तत्सम वाईट प्रथेचा प्रसार मात्र करतात असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला.

---

## आता अणुशक्तीच्या उत्पादनावर भर

ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट ह्या संघटनेच्या अणुशास्त्रज्ञांनी अणुशक्तीच्या उत्पादनाविषयी एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल अरब देशांचे तेलविषयक अडवणुकीचे धोरण अमलात येण्यापूर्वीचा आहे. संघटनेत अमेरिका, जपान, कॅनडा, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि कम्युनिस्ट देश सोडून पश्चिम युरोप इतक्यांचा समावेश आहे. संघटनेच्या तज्ज्ञांच्या मताने इ. स. २००० च्या सुमारास जगात विजेचे जे एकूण उत्पादन होईल त्यांपैकी निम्मे उत्पादन अणुशक्तीचा वापर करून झालेले असेल. जगातील औद्योगिक शक्तीची टंचाई दूर करावयाची असेल तर १९९० पर्यंत कमी किंमतीत उपलब्ध होऊ शकणाऱ्या युरेनिअमची उपलब्धता दरसाल ६० ते ८० हजार मेट्रिक टनाने वाढवावयास मात्र हवी.

---

**पंजाबमध्ये पाच दिवसांचा आठवडा** — पंजाब सरकारने स्वतःच्या कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा १ जानेवारी १९७४ पासून अमलात आणला आहे. सरकारी कचेऱ्या सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कामे करू लागल्या आहेत. दीडपासून दोन वाजेपर्यंत जेवणासाठी सुटी असते. शनिवारी आणि रविवारी कचेऱ्या बंद असतात. पेट्रोल आणि वीज ह्यांची बचत करण्यासाठी ही योजना आहे.

**एअर-इंडियाच्या पेट्रोल खर्चात वाढ** — एअर-इंडियाचा पेट्रोलचा खर्च ऑक्टोबर, १९७३ ते ३१ मार्च, १९७४ ह्या मुदतीत ६·४९ कोटी रु. नी वाढेल. म्हणजे तो १९७३–७४ मध्ये २३·४९ कोटी रु. होईल. मूळ अंदाजी खर्च १७ कोटी रु. आहे.

**मुलींना आकर्षण्यासाठी नेकटायवर V चिन्ह** — संतती-प्रतिबंधक नसबंदीच्या शस्त्रक्रियेचा प्रचार करण्यास V चिन्हाचा उपयोग इंग्लंडमध्ये करण्यात येतो. आता कित्येक पुरुष स्वतःच्या नेकटायवर ह चिन्ह प्रामुख्याने चित्रित करून त्यामुळे मुलींना आकर्षू पाहात आहेत. बॅरोनेस कर्क, ब्रिटनच्या हेल्थ एज्युकेशन सेंटरच्या भूतपूर्व चेअरमन, ह्यांनी म्हटले आहे, " माझ्यामुळे तुम्हाला गर्भधारणेची भीती वाटायचे कारण नाही." हे मुलींना सांगण्यासाठी पुरुष असा नेकटाय वापरीत आहेत, ही प्रवृत्ति घृणास्पद आहे."

**हेअर स्टाइलसाठी परदेशी तज्ज्ञ** — विवाहाच्या वेळी आपल्या नवऱ्या मुलाच्या केसांच्या रचनेसाठी मुंबईतील एका व्यापाऱ्याने लंडन येथील हेअर स्टायलिस्ट आणला होता. उद्या कदाचित नवऱ्या मुलाच्या इंपोर्टेड बुटांना पॉलिश करण्यासाठी बुट-पॉलिशवालाही इंपोर्ट केला जाईल! श्रीमंतीचे किळसवाणे प्रदर्शन करण्याची हौस आणि विदेशी गोष्टींची आकर्षणे कधी थांबणार!

**तांदळाची चोरटी निर्गत** — गुजरातमधील बलसार आणि सुरत जिल्ह्यातील बराचसा तांदूळ चोरट्या मार्गे निर्गत केला जातो असे गुजरातच्या अर्थमंत्र्यांनी सांगितले आहे. बलसारचा तांदूळ दमण बंदरामार्गे आणि सुरतचा तांदूळ भडोच, जामनगर आणि भावनगर बंदरांमार्गे पाठविला जातो. ह्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी गुन्हेगारावर बंदुक चालविण्यास पोलिसांना हुकूम देण्यात आला आहे.

**भारत ओव्हरसीज बँक** — नव्याने स्थापन झालेली भारत ओव्हरसीज बँक लवकरच बँगकॉकमधील इंडियन ओव्हरसीज बँकेचा व्यवहार स्वतःकडे घेईल. इंडियन ओव्हरसीज बँकेचे भारतात राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर तिचा व्यवहार तेथे चालु राहण्यास थाई सरकारचा विरोध आहे; तूर्त तात्पुरत्या परवान्यावर काम चालू आहे.

**७६·५ लक्ष रुपयांचे बूट रशिया घेणार** — स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि रशियन सरकार ह्यांचा एक करार नुकताच झाला आहे. त्या अन्वये रशिया भारताकडून ७६·५ लाख रु. किमतीचे कातडी बूट घेणार आहे.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣


फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



"भिडे" ओव्हर पिक

पॉवर लूम्स ५६,"६०"व ६४"



भिडे अॅन्ड सन्स प्रा. लि;

—सांगली—

रघुनाथराव भिडे

फोन नं. २०६९ कार्यकारी संचालक



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/1 आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिकार' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )